# अलंकारांचे महत्त्व

## विषयसूची

१. ग्रंथाचे संकलक आणि काही सूक्ष्म ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचा परिचय ५
२. ‘सात्त्विक अलंकार’ या ग्रंथमालिकेचे मनोगत ९
३. अलंकार विकत घेतांना घ्यावयाची काळजी ११

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे ‘*’ या चिन्हाने दर्शवले आहेत.)

१. ‘अलंकार’ या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ १३
२. अलंकाराचे काही समानार्थी शब्द १३
३. अलंकारांची निर्मिती १४
४. ईश्वरी गुण म्हणजे सूक्ष्मातील अलंकार १४
५. वैराग्यरूपी अलंकार (ब्रह्मदर्शक गुणस्वरूपी अलंकारिता) १६
६. ब्रह्मांडाचा अलंकार : शिवध्यान १७
७. देवता, मनुष्य आणि अलंकार १८
* काही अलंकार, त्यांच्यातील कार्यरत तत्त्व आणि संबंधित देवता २३
* देवतांचे अलंकार आणि त्यांचा मनुष्याला होऊ शकणारा उपयोग २३
८. युगांनुसार अलंकारांत होत गेलेले पालट (बदल) २५
९. अलंकारांची वैशिष्ट्ये २७
१०. अलंकारांचा वापर करण्यामागील उद्देश आणि महत्त्व २९
* अलंकार परिधान केल्याने देवतांच्या लहरी ग्रहण करता येणे ३१

* औक्षणात अलंकार वापरण्याचे महत्त्व ३४

* देवीला अर्पण केलेले अलंकार परिधान केल्यास त्या अलंकारांतील देवीची शक्ती आणि चैतन्य मिळणे ३४

* अलंकारांमुळे वाईट शक्तींपासून रक्षण होणे ३९

**११. अलंकाराचे धातू आणि त्यात जडवलेली रत्ने ५०**

* दागिन्यांत जडवलेल्या रत्नांचा शरिरावर चांगला परिणाम होणे ५५

**卐 'अलंकारांचे महत्त्व' विषयी अध्यात्मशास्त्रीय सखोल ज्ञान ५८**

## प.पू. डॉ. आठवले (संकलक) यांच्या तोंडून बाहेर पडलेले प्रत्येक वाक्य 'ब्रह्मवाक्य'असल्याची प्रचीती !

'सात्त्विक अलंकार' या ग्रंथमालिकेचे प्रसिद्धीपूर्व लिखाण संकलित होत असतांना त्यात असलेली एक शंका मी प.पू. डॉक्टरांना (प.पू. डॉ. आठवले यांना) विचारली. त्या वेळी बोलतांना मी या ग्रंथाचे लिखाण नेहमीच्या एका ग्रंथाच्या लिखाणापेक्षा थोडे जास्त असल्याचे त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी ''अलंकार' या विषयावर दोन ग्रंथ करायचे का ?'', असे विचारले; परंतु दोन ग्रंथ प्रसिद्ध होण्याइतके लिखाण हातात नसल्याने मी काहीच बोलले नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी साधकांना ईश्वरी कृपेमुळे मिळालेले ज्ञान आणि अलंकारांविषयी केलेले सूक्ष्मातील प्रयोग अन् अनुभूती यांचे मिळून दोन ग्रंथ प्रसिद्ध होण्याइतके लेखन हातात आले. या प्रसंगातून प.पू. डॉक्टरांच्या तोंडून बाहेर पडलेले प्रत्येक वाक्य 'ब्रह्मवाक्य' असल्याची प्रचीती आली.'

– कु. राजश्री सखदेव, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. F (२९६ अ ग्रं + PR 3AJMa)

('स्त्रियांच्या अलंकारांचे शास्त्र' या विषयावर एक लघुग्रंथ आणि पाच ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.)

# विषयसूचीतील क्रमांक २

## ‘सात्त्विक अलंकार’ या ग्रंथमालिकेचे मनोगत

नऊवारी साडी, कपाळावर कुंकू आणि जोडीला अलंकारांचा साज, ही हिंदु स्त्रीची पारंपरिक ओळख आहे. अलंकार हा हिंदु संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. हा वारसा गेल्या कित्येक पिढ्या अभिमानाने जपला गेला. काळ पालटला, तशी हिंदु संस्कृतीवर पाश्चात्त्य संस्कृतीची पुटे चढली. अलंकाररूपी वारशाकडे दुर्लक्ष होऊ लागले. ‘फॅशन’च्या नावाखाली आजकाल स्त्रिया बांगड्या घालत नाहीत आणि कुंकवाच्या ठिकाणी टिकली लावतात. काहींना पाटल्या, नथ, जोडवी यांसारखे अलंकार घालणे, हा प्रतिगामीपणा वाटतो ! त्या व्यतिरिक्त बर्‍याच जणांमध्ये ‘अलंकार म्हणजे ऐश्वर्याचे प्रदर्शन करण्याची वस्तू’ असा चुकीचा भौतिकवादी दृष्टीकोनही रूढ झालेला आहे. ‘अलंकार म्हणजे दैवी कृपा होण्यासाठी साहाय्य करणारी वस्तू’, हा अध्यात्मशास्त्रीय दृष्टीकोन बिंबवण्यासाठी या ग्रंथमालिकेचे प्रयोजन केले आहे.

अलंकार परिधान केल्यामुळे ईश्वरी शक्ती आणि चैतन्य मिळते, शरिरातील काळ्या (अनिष्ट) शक्तीमध्ये घट होते, वाईट शक्तींच्या आक्रमणांपासून रक्षण होते, अलंकार घातलेल्या भागांवर ‘बिंदूदाबन (ॲक्युप्रेशर)’ उपाय होतात... यांसारखे अलंकारांचे महत्त्व अन् लाभ अनेक अंगांनी या ग्रंथांत शास्त्रासह स्पष्ट केले आहेत. विविध धातूंपासून बनवलेल्या अलंकारांची तुलना; स्त्रिया, पुरुष आणि लहान मुले यांचे अलंकार; अलंकारांची शुद्धी इत्यादींविषयी शास्त्रीय विवेचनही यात दिले आहे. अलंकार घातल्यावर सूक्ष्मातून नेमकी काय प्रक्रिया घडते, हे सर्वसामान्य व्यक्तीला कळू शकत नाही. हे कळण्याची क्षमता असलेल्या सनातनच्या साधकांनी केलेली ‘सूक्ष्म-परीक्षणे’ आणि काढलेली ‘सूक्ष्म-ज्ञानाविषयीची चित्रे’, हे या ग्रंथांचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. सोन्याची

साखळी, सोन्याची अंगठी, सात्त्विक आणि आसुरी अलंकार इत्यादींच्या संदर्भात साधकांनी केलेले 'सूक्ष्मातील प्रयोग' अलंकारांकडे आध्यात्मिक दृष्टीकोनातून कसे पहायचे, हे शिकवतात.

अलंकारांचा अध्यात्मशास्त्रीय लाभ होण्यासाठी सर्व अलंकार परिधान करणे आवश्यक नसून स्वतःच्या आर्थिक स्थितीनुसार धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे मोजके अलंकार परिधान केले तरी चालते; कारण 'अलंकार किती आणि कोणते' यांपेक्षा 'अलंकार परिधान करण्यामागील भाव' महत्त्वाचा आहे. ज्यांना सोन्याचे अलंकार घालणे शक्य नाही, त्यांनी सोन्याचा मुलामा दिलेले किंवा चांदीचे अलंकार किंवा तसा एकतरी अलंकार घालावा. ईश्वरप्राप्तीसाठीच्या एकूण साधनेच्या दृष्टीने नामजप, सत्सेवा आदी साधनाप्रकारांतून होणाऱ्या लाभाच्या तुलनेत अलंकारांमुळे होणारा लाभ अत्यल्प आहे. असे जरी असले, तरी साधना न करणाऱ्यांना किंवा प्राथमिक अवस्थेतील साधकांना सात्त्विकता वाढवण्याच्या दृष्टीने अलंकार वरदानच ठरतात.

हे ग्रंथ वाचून अलंकारांकडे पहाण्याचा आध्यात्मिक दृष्टीकोन सर्वांमध्ये निर्माण व्हावा आणि अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानता लक्षात यावी, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**


## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

- शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी योग्य साधनेची शिकवण !
- साधनेतील अडचणी दूर करून साधनेला दिशा देणे !
- अध्यात्म समजवण्यासाठी निरनिराळ्या साधनामार्गांचे तुलनात्मक विवेचन !
- ईश्वरी कृपा आणि अनेक वर्षांच्या साधनेमुळे सनातनच्या काही साधकांची जागृत झालेली अध्यात्मातील प्रतिभा यांमुळे काही साधकांना सूक्ष्मातून मिळत असलेल्या ज्ञानाचा समावेश !